# शेतकऱ्यांना वाचवायचे तर योग्य हमीभाव हा एकच मार्ग
# जीएसटीसाठी बैठका घेतल्या! आता हमीभावासाठी बैठका घ्या

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

राज्यातील शेतकऱ्यांची अत्यंत बिकट परिस्थिती आहे. दोन वर्षे दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्याला गेल्या वर्षी पावसाने अखेर साथ दिली. त्यामुळे भरघोस उत्पादन आले. पण या भरघोस उत्पादनानेही शेतकऱ्यांचा घात केला. याचे कारण म्हणजे आवक वाढल्याने कांद्यापासून तुरीपर्यंत शेतमालाचे भाव गडगडले. त्यात राज्य सरकारने शहरी नागरिकांची काळजी घेत भाव वाढू नये म्हणून शेतमालाची आयात करून ठेवली होती. त्यामुळे भावाची अधिकच घसरण झाली.

दुर्दैवाने शेतकऱ्यांच्या समस्येवर सरकारने वेळीच विचार केला नाही. ऐनवेळी निर्णय घ्यायचे आणि जाहिरातबाजी करायची या शासनाच्या कार्यपद्धतीने शेतकऱ्यांचे हीत होण्याऐवजी सातत्याने नुकसान होत आहे. मुख्यमंत्री शाश्वत सिंचन, शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग यावर भाष्य करीत आकडेवारी सादर करतात. त्यांची ही धोरणे फळाला येतील की नाही, हा आजचा चर्चेचा विषय असू शकत नाही. कारण सिंचन वाढवले, शेतमाल प्रक्रिया उद्योग उभारले तरी जोपर्यंत शेतमालाला योग्य भाव मिळत नाही तोपर्यंत शेतकरी जगणार कसा? शेतकरी कांदा पिकवतो, तूर पिकवतो, फळबागा लावतो त्यासाठी त्याला जेवढा खर्च येतो तो खर्च वजा जाऊन त्याला थोडा नफा मिळायलाच हवा. केवळ शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारून उपयोग नाही. भरघोस पीक आले तर हे उद्योगही भाव पाडूनच शेतमाल विकत घेणार आहेत. त्यामुळे आजच्या परिस्थितीत शेतमालाचा योग्य हमीभाव ठरविणे सर्वात महत्त्वाचे आहे.

सरकारने यावरच प्राधान्याने विचार करून तातडीने निर्णय घ्यायला हवा. त्याऐवजी कर्जमाफी की कर्जमुक्ती यावर वेळ वाया घालवणे सुरू आहे. त्यातच केवळ ३१ लाख अल्पकर्जधारक शेतकऱ्यांसाठी योजना आखीत आहोत, असे म्हणत सरकारने संपात फूट पाडण्याचा प्रयत्न केला आहे. ज्याला आपण अन्नदाता म्हणतो त्याची अशी हेळसांड करणे योग्य नाही. केंद्र सरकारला जीएसटी लागू करायचा आहे. त्यासाठी त्यांनी देशभरातील अर्थमंत्र्यांच्या बैठकावर बैठका घेतल्या आणि प्रत्येक उत्पादन आणि सेवेवर किती टक्के कर लावायचा हे निश्चित केले. त्याबाबत एकमतही घडवून आणले. अशाच तऱ्हेने बैठका घेऊन शेतमालाला किती हमीभाव द्यावा याचा तातडीने निर्णय का घेत नाही? शासन प्रतिनिधी, शेतकरी प्रतिनिधी, संबंधित मंत्री आणि विरोधी पक्ष नेते यांच्या बैठका घेऊन नवे हमीभाव निश्चित करणे ही आजची गरज आहे. उत्पन्नाचा खर्च आणि ५० टक्के नफा यानुसार हमीभाव ठरवला जाईल, असे आश्वासन पंतप्रधान मोदींनीच २०१४ च्या निवडणुकीत दिले होते. हेच सूत्र धरून हमीभाव ठरवायला हवा. जोपर्यंत योग्य हमीभाव ठरत नाही तोपर्यंत शेतीत कितीही भांडवल ओतले तरी शेतकऱ्याचे मरणच आहे.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी वेतनवाढीचे करार होतात. पण केवळ वेतनवाढ होत नाही. तर त्या वर्षाची परिस्थिती पाहून महागाई भत्ता दिला जातो. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना या महागाई भत्त्याचा मोठा दिलासा असतो कारण त्या काळातील परिस्थितीनुसार महागाई भत्ता ठरवायचा असतो. मग हाच नियम शेतकऱ्यांनाही लागू झाला पाहिजे. त्यांच्या शेतमालाचा नवा हमीभाव तर ठरविलाच पाहिजे, पण या हमीभावाबाबत दर पाच वर्षांनी पुन्हा विचार झाला पाहिजे. हे केले तरच शेतकरी हा 'बळीराजा' राहील. अन्यथा त्याचा तर बळी जाईलच, पण राज्य अन्नपुरवठ्याबाबत कायमचे परावलंबी होईल.